**माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत प्राप्त बक्षीस रकमेतून हाती घ्यावयाच्या कामांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) प्रशासकीय मान्यता देण्याबाबत. पालम नगरपंचायत, जिल्हा परभणी**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: मावअ २०२६/प्र.क्र.२८९(०७)/तां.क.१**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक: १६ ऑक्टोबर, २०२६

**वाचा:**

(१) शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्र. अभियान- २०२४/प्र.क्र. ६६/ .तां. क.१ दिनांक २७ सप्टेंबर, २०२४

(२) शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्र. अभियान- २०२१/प्र. क्र.५७/ तां.क. १, दिनांक ८ फेब्रुवारी, २०२२

(३) प्रशासकीय मान्यता देण्यासाठी गठीत समितीच्या दिनांक ०१ सप्टेंबर, २०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

**प्रस्तावना :**

माझी वसुंधरा अभियान ४.० मधील १२ गटातील विजेत्या स्थानिक स्वराज्य संस्थांना रोख रकमांची पारितोषिके व सदर बक्षीस रकमेच्या विनियोगाची कार्यपध्दती संदर्भीय क्रमांक (१) येथील दिनांक २७ सप्टेंबर, २०२४ च्या शासन निर्णयान्वये जाहिर करण्यात आली आहे. त्यानुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांनी पारितोषिकाच्या रकमेमधून हाती घ्यावयाच्या कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून, त्यास संदर्भीय क्रमांक (२) येथील दिनांक ०८ फेब्रुवारी, २०२२ च्या शासन निर्णयान्वये मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीकडून प्रशासकीय मान्यता घ्यावयाची आहे.

२. त्यानुसार, बक्षीस मिळालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्राप्त झालेल्या सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्यासाठी मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०१ सप्टेंबर, २०२६ रोजी झालेल्या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थांनी सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालावर चर्चा होवून समितीने शिफारशी केल्या आहेत. समितीने केलेल्या शिफारशीनुसार संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत पालम नगरपंचायतीला प्राप्त होणाऱ्या एकूण रु. ५०.०० लक्ष बक्षिसांच्या रकमेमधून हाती घ्यावयाच्या रू. ५०,३८,९४०.०० (रुपये पन्नास लक्ष अडतीस हजार नऊशे चाळीस फक्त) किंमतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल मुख्याधिकारी, पालम नगरपंचायत, यांनी शहर अभियंता, नांदेड वाघाळा महानगरपालिका यांची तांत्रिक मान्यता घेवून सादर केला आहे. पालम नगरपंचायतीने सादर केलेला सदर प्रस्ताव मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीच्या दिनांक ०१ सप्टेंबर, २०२६ रोजी

झालेल्या बैठकीत विचारात घेण्यात आला. पालम नगरपंचायतीने सादर केलेल्या प्रस्तावातील अ.क्र. ५ येथील रु. ६,०१,४७३.०० किंमतीचे कामे वगळून उर्वरित रू. ४४,३७,४६७.०० (रुपये चौवेचाळीस लक्ष सदतीस हजार चारशे सदूसष्ठ फक्त) किंमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याची शिफारस समितीने केली. मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीने केलेल्या शिफारसीनुसार, पालम नगरपंचायतीने सादर केलेल्या एकूण रू. ४४,३७,४६७.०० (रुपये चौवेचाळीस लक्ष सदतीस हजार चारशे सदूसष्ठ फक्त) किंमतीच्या सविस्तर प्रकल्प अहवालातील कामांना **खालील अटी व शर्तीच्या अधिन शासन प्रशासकीय मान्यता देत आहे. प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात येत असलेली कामे सोबतच्या जोडपत्र-१ मध्ये दर्शविण्यात आली आहेत.**

**२. अटी व शर्ती**

१) सदर सविस्तर प्रकल्प अहवालातील कामांसाठी कार्यान्वयन यंत्रणा **पालम नगरपंचायत** राहील.

२) समितीने प्रशासकीय मान्यतेसाठी शिफारस न केलेल्या **रु. ६,०१,४७३.००** रकमेचा विनियोग पालम नगरपंचयातीने शहरातील हरित क्षेत्र वाढीसाठी स्थानिक/देशी प्रजातींची वृक्ष व बांबू लागवडीचा समावेश असलेला **सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून महानगरपालिकेचे शहर अभियंता यांची तांत्रिक मान्यता घेऊन तो प्रशासकीय मान्यतेसाठी पुन्हा शासनास सादर करावा.**

३) सदर सविस्तर प्रकल्प अहवालात नमूद केलेल्या कामांच्या अंमलबजावणीचा आर्थिक व भौतिक प्रगती अहवाल दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत माझी वसुंधरा अभियान संचालनालयास पाठविण्यात यावा.

४) सदर सविस्तर प्रकल्प अहवालातील कामांची अंमलबजावणी प्रशासकीय मान्यता मिळाल्यापासून पुढील ६ महिन्यात पूर्ण करावी.

५) बक्षीस रकमेपेक्षा अधिकचा खर्च झाल्यास तो स्वनिधी मधून करण्यात यावा.

६) सदर सविस्तर प्रकल्प अहवालातील मूळ प्रकल्प किंमतीमध्ये कोणत्याही कारणास्तव वाढ झाल्यास, त्यासाठी कोणताही वाढीव निधी / अनुदान उपलब्ध करून दिले जाणार नाही.

३. माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत पालम नगरपंचायतीला "नगरपरिषद व नगरपंचयात गट (१५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या)" या गटात विभागस्तरावर तिसऱ्या क्रमांकासाठी रु. ५०.०० लक्ष रकमेचे बक्षिस प्राप्त झाले आहे. यापैकी ५०% म्हणजे रू. २५.०० लक्ष एवढी रक्कम त्यांना वितरीत करण्यात आली आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६१०१६१३३२५८७५०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHAHEEN SWALI SHAIKH
Digitally signed by SHAHEEN SWALI SHAIKH
Date: 2026.10.16 14:35:29 +05'30'

**( शाहीन शेख )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई, ४०००३२

२) मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई, ४०००३२

३) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा, युवक कल्याण अल्पसंख्याक विकास आणि औकाफ), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई, ४०००३२

४) मा. मंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई, ४०००३२
५) मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई
६) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई
७) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई
८) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग
९) जिल्हाधिकारी, परभणी
१०) मुख्याधिकारी, पालम नगरपंचायत
११) निवडनस्ती तां.क.१

**जोडपत्र- १**

शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्रमांक: मावअ २०२६/प्र.क्र.२८९(०७)/तां.क.१
दिनांक: १६ ऑक्टोबर, २०२६ चे सहपत्र

| Sr. No. | Proposed Work | Estimated Cost (in Rs.) | Cost approved under administrative sanction (in Rs.) |
|---|---|---|---|
| 1 | Tree Plantation @ open space within Nagar Panchayat Jurisdiction under Majhi Vasundhara Abhiyan | 8,30,325.00 | 8,30,325.00 |
| 2 | Roadside tree plantation @ kolwadi road within Nagar panchayat Jurisdiction under Majhi Vasundhara Abhiyan | 5,35,732.00 | 5,35,732.00 |
| 3 | Dense tree plantation @ Dhangar Samaj Bhumi/ Bhumi/ another directed plot within nagarpanchayat jurisdiction under Majhi Vasundhara Abhiyan | 8,86,504.00 | 8,86,504.00 |
| 4 | Tree Plantation setup work @ within Palam nagarpanchayat Under Majhi Vasundhara Abhiyan | 4,96,223.00 | 4,96,223.00 |
| 5 | Existing 1500 tree maintenance within Palam Nagarpanchayat Jurisdiction under Majhi Vasundhara Abhiyan | 6,01,473.00 | 0.00 |
| 6 | Two/Four wheeler charging station @Nagarpanchayat building under majhi vasundhara Abhiyan | 3,64,283.00 | 3,64,283.00 |
| 7 | Rainwater Harvesting @ Tahshil Office Building within Nagarpanchayat Jurisdiction under majhi vasundhara Abhiyan | 1,54,914.00 | 1,54,914.00 |
| 8 | Ground water recharge pit @ Nagarpanchayat Jurisdiction Under Majhi Vasundhara Abhiyan | 2,25,986.00 | 2,25,986.00 |
| 9 | Providing, installation commissioning and giving satisfactory test and trial of 30-watt solar streetlight for palam nagarpanchayat Under Majhi Vasundhara Abhiyan | 5,31,000.00 | 5,31,000.00 |
| 10 | IEC | 2,50,000.00 | 2,50,000.00 |
| 11 | TS and PMC Charges | 1,62,500.00 | 1,62,500.00 |
| | **Total** | 50,38,940.00 | 44,37,467.00 |